# महाधन सारथी

कृषि त्रैमासिक

स्मार्टकेम टेक्नॉलॉजीज् लिमिटेड


For Private Circulation only

वर्ष १ ले ● अंक २
जुलै ते सप्टेंबर २०१८

www.mahadhan.co.in

## महाधन मिस्ड कॉल धमाका

१० बुलेट-३५० सी सी मोटरसायकल
**बंपर प्राईज**



जीप कंपास
**मेगा प्राईज**



### मिस्ड कॉल द्या, बक्षिसे जिंका!*

## ८८८८६०६५०१

३० सॅमसंग स्मार्टफोन
दर पंधरा दिवसांनी

महाधन खते वापरा व वरील क्रमांकावर मिस्ड कॉल द्या!

रू.७५०० किंमतीचे महाधन
गिफ्ट कूपन (२४०)-
दर आठवड्याला

रू.७५००/-

## जिंका

स्पर्धा कालावधी

**२२ जून २०१८ ते ५ ऑगस्ट २०१८**

स्मार्टकेम
टेक्नॉलॉजीज्
लिमिटेड

*नियम व अटी लागू, अधिक माहितीसाठी www.mahadhan.co.in वर लॉग ऑन करा.

# फवारणीद्वारे विद्राव्य खतांचा कार्यक्षम वापर

भारतातील व प्रामुख्याने महाराष्ट्रातील अन्नधान्याचे उत्पादन आणि उत्पादकता कमी असण्याच्या मुख्य कारणामध्ये आपल्याकडील बदलते हवामान कमी झालेली जमिनीची सुपिकता, खत आणि पाण्याच्या नियोजनाचा अभाव यांचा प्रामुख्याने समावेश होतो.

आधुनिक शेतीमध्ये सुधारित – संकरित बियाण्याचा वापर, माती परिक्षणानुसार एकात्मिक अन्नद्रव्याचा वापर, ठिबक / तुषार माध्यमातून पाण्याचा कार्यक्षम वापर, पीक संरक्षण आणि बदलत्या हवामानानुसार आपत्कालीन पीक नियोजन आणि व्यवस्थापन केल्यास निश्चित अधिक दर्जेदार उत्पादन मिळू शकते.

महाराष्ट्रात फक्त १८ टक्के क्षेत्र बागयती खाली असल्याने, कोरडवाहू क्षेत्रामधूनच अधिकाधिक उत्पादन काढणे महत्वाचे ठरते तेव्हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने खरीप हंगाम खुपच महत्वपूर्ण असतो. मागील दोन ते तीन वर्षातील दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट आणि अवकाळी पाऊस व इतर नैसर्गिक संकटामुळे शेतकरी हैराण झाला आहे.

ह्यावर्षी जूनमधील सुरूवातीस आलेल्या पावसाचा पुरेपुर वापर करून घेण्यासाठी शेतकरी बांधवानी, जमिनीच्या पूर्वमशागती बरोबर पेरणी उरकण्याचा प्रयत्न केला. स्वतःकडे असणारे बी–बियाणे तसेच विकतचे महागडे बियाणे यांचा वापर केला. पिकांची चांगली उगवण व सुरूवातीची जोमदार वाढ व्हावी या उद्देशाने बीज प्रक्रिया केली. त्यामध्ये रोगनाशकाशिवाय जीवाणू खतांचा म्हणजेच द्विदल धान्य पिकांसाठी रायझोबियम तर एकदल पिकासाठी ॲझोटाबॅक्टर बरोबर स्फुरद विरघळाणारे जीवाणू (पी.एस.बी) खतांचा वापर केला. पिकाची उगवण व वाढीला सुरूवात होते ना होते तोच पावसाने मोठी विश्रांती घेतली. त्यात वाऱ्याचा वेग व तापमान वाढल्यामुळे, जमिनीतील ओलावा कमी झाला. पाऊस पडण्यास अनुकूल वातावरण नसल्याने राज्यात पावसाने उघडीप दिली आहे. अंशतः ढगाळ हवामान असल्याने ढग येतात व निघून जातात पण पाऊस पडत नाही. पिके हातची जातात की काय, दुबार पेरणी करावी लागणार की काय अशा काळजीत शेतकरी वर्ग सध्या आहे.

ज्या ठिकाणी शेती केवळ पावसावर अवलंबून आहे आणि सिंचन सुविधा नाही अशा परिस्थितीत, बुडत्याला काठीचा आधार म्हणून जमिनीतील पिकांच्या मुळाच्या खालील थोडीफार ओल उचलुन घेण्याची ताकद पिकांना येण्यासाठी, पिकांना प्रथम सशक्त करणे गरजेचे आहे. पिकांना पानावाटे पोषक आहार देवून, मुळाची ताकद वाढवून ती अधिक खोलवर नेवून, जमिनीतील ओलावा खेचून वाढ करून घेता येते. त्यासाठी सर्व पिकांना वाढीच्या अवस्थेनुसार ०.५ ते १ टक्का नत्र, स्फुरद व पालाशयुक्त खते ५० ते १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात विरघळवून पानावाटे देणे अतिशय गरजेचे आहे. एकरी १५० ते २०० लिटर पाणी लागते त्यासाठी बाजारात अनेक विद्राव्य खते उपलब्ध आहेत.

**स्मार्टटेक टेक्नॉलॉजिजस लिमिटेड कंपनीने महाधन अमृता नावाने खालील विविध खते बाजारात उपलब्ध करून दिलेली आहेत, व त्याचा वापर शेतकऱ्यांनी जरूर करावा.**

| अ. क्र. | विद्राव्य खतांचा प्रकार | पीक अवस्था |
|---|---|---|
| १. | २४:२४:० | सुरूवातीच्या शाखीय व जोमदार वाढीच्या अवस्थेत |
| २. | १९:१९:१९ | वाढीच्या अवस्थेत |
| ३. | १२:६१:०० व कॅल्शिअम नायट्रेट | फुलोऱ्याच्या अवस्थेत असताना (वेगवेगळी द्यावीत) |
| ४. | ००:५२:३४ व १३:४०:१३ | फुलोरा ते फळ धारणेच्या अवस्थेत (वेगवेगळी द्यावीत) |
| ५. | १३:००:४५ व ००:००:५० | फळ वाढीच्या अवस्थेत असताना (वेगवेगळी द्यावीत) |

**पाऊस जरी कमी जास्त झाला तरी पिकांना आधार देण्याचे कार्य ही खते करणार आहेत.**

वरील सर्व खतांचे प्रमाण ०.५ ते १.०% प्रमाणे ठेवावे (५० ते १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी). फवारणी सकाळी तसेच संध्याकाळी वाऱ्याचा वेग व कमी सूर्यप्रकाश असताना करावी.

बऱ्याचदा अन्नद्रव्याची पिकांना उपलब्धतता ही जमिनीचे तापमान, ओलावा, हवामानातील बदल, सामू चूनखडीचे प्रमाण, सेंद्रिय कर्ब इत्यादी बाबींवर अवलंबून असते. अशा प्रतिकूल परिस्थितीत पिकांवरील पाण्याचा आणि अन्नद्रव्यांचा ताण हा पीक पोषणावर व वाढीवर अनिष्ठ परिणाम करीत असतो. एखाद्या आजारी माणसाला सलाईन वाटे टॉनिक देवून त्याचा थकवा, अशक्तपणा कमी केला जातो त्याचप्रमाणे, पिकाची वाढ मर्यादित कालावधी मध्ये कमी झाली असेल तर त्यास आधार देण्यासाठी आणि तग धरून ठेवण्यासाठी, थोडेसे टॉनिक म्हणून अन्न व पाणी पिकांना, पानावाटे देणे अति महत्वाचे आहे. त्यामुळे बदलल्या हवामानात पीक तग धरून वाढत राहते. पिकामध्ये प्रतिकारशक्ती वाढते व पीक कीड व रोगास कमी बळी पडते व अधिक गुणवत्तापूर्ण उत्पादन मिळते. केवळ एक फवारणी करून चालणार नाही तर वेळप्रसंगी १५–२५ दिवसांनी पिकांच्या वाढीनुसार, खतामधील मुख्य, दुय्यम आणि सुक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करणे गरजेचे आहे.

फवारणीद्वारे देण्यात येणाऱ्या खतांचे प्रमाणे कमी असल्याने खर्च कमी येतो व ती अधिक फायदेशीर ठरतात. शिवाय अशा संक्रमण परिस्थितीतून निभावून नेण्यासाठी, विद्राव्य खतांचा वापर करणे हितावह ठरते. त्यांचा कार्यक्षम वापर होण्यासाठी द्रावणामध्ये स्टीकर वापरतात. खते पानावर विस्तारून चिकटून जास्त वेळ राहिल्यास, पानावाटे अन्नद्रव्ये शोषून घेण्यास मदत होते. विद्राव्य खतामध्ये चिलेटयुक्त सूक्ष्म अन्नद्रव्ये सुध्दा बाजारात मिळतात. त्याचा वापर पीक वाढीच्या दुसऱ्या अवस्थेत करावा परंतु पेरताना जरी जमिनीतून मुख्य खते दिली असली तरी ओलावा मर्यादित असल्याने ती पिकांना घेता येत नाहीत. त्यासाठी सुरूवातीस, मुख्य अन्नद्रव्यामध्ये नत्र, स्फुरद व पालाश तसेच मॅग्नेशियम, गंधकाचा वापर करावा व आपत्कालीन परिस्थितीवर मात करावी.

CMYK

# मका पिकासाठी महाधन खतांचे व्यवस्थापन

मका हे विविध प्रकारचे उदयोन्मुख पिकांपैकी एक असुन वर्षभर देशातील सर्व राज्यांमध्ये घेतले जाते जसे धान्य, चारा, स्वीटकॉर्न, बेबीकॉर्न व पॉपकॉर्न. मक्याचा उपयोग प्रामुख्याने मानवी खाद्य व पशुखाद्या बरोबरच हजारो औद्योगिक उत्पादनांचे मूलभूत कच्चा माल म्हणून वापर केला जातो. ज्यामध्ये स्टार्च, तेल, प्रथिने, मादक पेये, अन्न गोड करणारे पदार्थ, औषधोत्पादन, कॉस्मेटिक, डिंक आणि पेपर उद्योग इत्यादींचा समावेश होतो.

भारतात, मका हे तांदूळ आणि गव्हानंतर तिसरे सर्वात महत्वाचे अन्न पिक आहे. जागतिक स्तरावर, मका हे धान्यांचे राणी पीक म्हणून ओळखले जाते कारण मका पिकात इतर धान्य पिकांपेक्षा सर्वाधिक आनुवांशिक उत्पन्न घेण्याची क्षमता आहे.

**मका पिकाचे संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन:**

१) मका हे जास्त अन्नद्रव्याची मागणी पीक म्हणून मानले जाते आणि म्हणून मका पिकाचे संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

२) मका पीक हे सी ४ प्रकारच्या कार्बन मेटॅबॉलिझम (सी ४ प्रकारचे प्रकाश संश्लेषण) प्रकारात मोडते. म्हणून प्रभावी प्रकाश संश्लेषणासाठी मकेच्या वाढीच्या अवस्थेनुसार अन्नद्रव्ये पुरवण्याची आवश्यकता आहे.

३) मका पिकाच्या लागवडीत शेण खताचा प्रतिसाद लक्षणीय आहे आणि म्हणूनच मकेच्या अधिक उत्पादनासाठी संतुलित (आयएनएम) अन्नद्रव्य व्यवस्थापन करणे खूप महत्त्वाचे धोरण आहे.

४) मका पिकासाठी प्रतिएकरी शिफारीत केलेली खत मात्रा ४८:२४:१६ किलो नत्र, स्फुरद, पालाश व १० किलो झिंक सल्फेट आहे.

५) पेरणीच्या १० ते १५ दिवस अगोदर ४ मे टन प्रति एकरी चांगले कुजलेले शेणखत (एफवायएम) मातीत मिसळून माती आड करावे.

६) शिफारस केलेल्या एकूण खत मात्रा पैकी संपूर्ण स्फुरद, पालाश आणि झिंक सल्फेट पेरणीच्या वेळेस बेसलडोस म्हणून द्यावा.

७) मक्याच्या जोमदार वाढीसाठी व जास्त उत्पादनासाठी संपूर्ण हंगामात नत्राचा पुरेसा पुरवठा करणे आवश्यक आहे. म्हणूनच नत्र खताची मात्रा ५ वेळेस खालील दिलेल्या वाढीच्या अवस्थेनुसार विभागून द्यावी.

| पीक वाढीची अवस्था | नत्र खताची मात्रा (%) |
|---|---|
| पेरणी वेळी | २० |
| व्ही ४ (चार पानाची अवस्था) | २५ |
| व्ही ८ (आठ पानाची अवस्था) | ३० |
| व्हीटी (तुरा अवस्था) | २० |
| जी एफ (दाणे भरण्याची अवस्था) | ५ |

**मका पिकासाठी शिफारीत खताची मात्रा (किलो/एकर) : ४८ किलो नत्र, २४ किलो स्फुरद व १६ किलो पालाश**

| पेरणी नंतरचे दिवस | पिकाची अवस्था | खताचे नाव | मात्रा (किलो/एकर) | खत वापरण्याची पध्दत |
|---|---|---|---|---|
| ० | पेरणीच्या वेळी | स्मार्टटेक १०:२६:२६ | ५० | जमिनीतून पहिला डोस (सर्व रासायनिक खते मिसळुन मुळांच्या कार्यक्षेत्रात माती आड करून द्यावीत) |
| | | महाधन बेनसल्फ | १० | |
| | | महाधन मॅग्नेशियम सल्फेट | २५ | |
| | | महाधन झिंक सल्फेट | १० | |
| | | महाधन फेरस सल्फेट | १० | |
| | | महाधन डिटीबी बोरॉन | ५ | |
| २५ | ४ पानाची अवस्था | युरीया | ३५ | जमिनीतून दुसरा डोस |
| ४० | ८ पानाची अवस्था | महाधन २४:२४:०० | ५० | जमिनीतून तिसरा डोस |
| ५० | जोमदार शाखीय वाढ | युरीया | ५ | फवारणीमधून |
| | | महाधन झिंक सल्फेट | १. ५ | |
| ६० | | महाधन स्मार्ट २४:२४:०० | ३ | फवारणीमधून |
| | | महाधन १३:००:४५ | ३ | |
| ७५ | तुरा अवस्था | युरीया | २० | जमिनीतून चौथा डोस |
| ९० | दाणे भरण्याची अवस्था | युरीया | ५ | जमिनीतून पाचवा डोस |
| | | महाधन म्युरेट ऑफ पोटॅश | ५ | |

# आडसाली ऊसाचे विद्राव्य खतांद्वारे अन्नद्रव्य व्यवस्थापन

उपलब्ध सूर्यप्रकाश, अन्नद्रव्य, पाणी, हवा व अवकाश या सर्वाचा अतिशय कार्यक्षम पणे वापर करून अधिक उत्पादन देणाऱ्या काही निवडक पिकांमध्ये ऊस पिकाचा समावेश होतो. इतर सर्व घटक अनुकूल असताना उत्पादकता वाढीसाठी अन्नद्रव्यांचा कार्यक्षम वापर अत्यंत महत्वाचा ठरतो. पिकाच्या गरजेनुरुप व संतुलित अन्नद्रव्य व्यवस्थापनामुळे उत्पादकता तर वाढतेच परंतु अन्नद्रव्यांच्या मात्रेत मोठी बचत होते. त्यासाठी ठिबकद्वारे विद्राव्य खतांचा वापर उपयुक्त ठरतो. ऊस पिकाची गरज जर पाहिली तर १०० टन उत्पादना करीता त्याला २०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद, ३०० किलो पालाश, ३० किलो गंधक व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये लागतात. ऊसाच्या अन्नद्रव्य व्यवस्थापनात विशेष लक्ष देण्याचे मुद्दे खालील प्रमाणे

१) नत्र खतांचा शक्य होईल तेव्हढा विभागुन वापर करावा. २) नत्राच्या अधिक चांगलया वापरासाठी त्यासोबत पालाश नत्राच्या १/३ मात्रेत द्यावा. ३) सुरवातीच्या काळात नत्र व स्फुरदाची आवश्यक्ता जास्त असल्याने महाधन २४:२४:०० सारख्या खतांचा वापर करावा. ४) साखर व वजन वाढीसाठी एकरी २५ किलो बेनसल्फचा वापर दोन टप्यात करावा. ५) साखर भरण्याच्या काळात नत्र खतांचा वापर करून या काळात पोटॅशचा वापर वाढवावा. ६) चुनखडीयुक्त, क्षारवट व चोपण जमिनित चिलेटेड स्वरूपातील सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करावा. ७) सेंद्रीय तसेच जीवाणू खतांचा वापर मुबलक करावा. ८) अन्नद्रव्यांच्या कमतरते मध्ये फवारणीद्वारे खत वापर करावा.

## आडसाली ऊसासाठी विद्राव्य खत व्यवस्थापन

| लागवडीनंतरचे आठवडे | पिकाची अवस्था | खताचे नाव | मात्रा (कि/एकर) |
|---|---|---|---|
| -१ | बेसल डोस | निंबोळी पेंड | १२० |
| | | महाधन सेंद्रिय खत | २००० |
| | | महाधन बेनसल्फ | १५ |
| १ ते ४ | उगवण | महाधन १२:६१:०० | १२ |
| | | महाधन १३:००:४५ | १२ |
| | | युरीया | ३५ |
| | | महाधन कॅल्शियम नायट्रेट | ५ |
| | | महाधन मॅग्नेशियम सल्फेट | १० |
| | | महाधन चिलेटेड जस्त | ०.५ |
| | | महाधन चिलेटेड लोह | ०.५ |
| | | महाधन डॉट बोरॉन | ०.५ |
| ५ ते ९ | फुटव्यांची सुरूवात | महाधन स्मार्ट २४:२४:०० | ७५ |
| | | महाधन १३:००:४५ | २५ |
| | | युरीया | ५० |
| | | महाधन कॅल्शियम नायट्रेट | ५ |
| | | महाधन मॅग्नेशियम सल्फेट | १० |
| | | महाधन चिलेटेड जस्त | ०.५ |
| | | महाधन चिलेटेड लोह | ०.५ |
| | | महाधन डॉट बोरॉन | ०.५ |
| १० ते १२ | फुटव्यांची वाढ | महाधन स्मार्ट २४:२४:०० | १२५ |
| | | महाधन १३:००:४५ | ३० |
| | | युरीया | ७० |
| | | महाधन मॅग्नेशियम सल्फेट | १० |
| | | महाधन चिलेटेड जस्त | ०.५ |
| | | महाधन चिलेटेड लोह | ०.५ |
| | | महाधन डॉट बोरॉन | ०.५ |
| १६ ते १८ | मोठी बांधणी | निंबोळी पेंड | १२० |
| | | महाधन सेंद्रिय खत | २००० |
| | | महाधन बेनसल्फ | १० |
| २१ ते २६ | जोमदार वाढीची अवस्था | महाधन ००:००:५० | ५० |
| | | महाधन मॅग्नेशियम सल्फेट | २० |
| | | महाधन चिलेटेड जस्त | ०.५ |
| | | महाधन चिलेटेड लोह | ०.५ |
| | | महाधन डॉट बोरॉन | ०.५ |

CMYK

# डाळींबातील अन्नद्रव्य व्यवस्थापन

**डाळींबाच्या अन्नद्रव्य व्यवस्थापनात खालील मुद्दे लक्षात घ्यावेत.**

१. ६०% नत्र बहार संपल्यापासून ते बहार धरेपर्यंतच्या कालावधीत द्यावा व उरलेला ४०% फळ फुगवणीच्या काळात द्यावा.
२. ५० % स्फुरद बहार संपल्यापासून ते बहार धरेपर्यंतच्या कालावधीत द्यावा व उरलेला, २५% फुलंधारणेच्या तसेच २५% फळ फुगवणीच्या काळात द्यावा.
३. ४०% पालाश बहार संपल्यापासून ते बहार धरेपर्यंतच्या कालावधीत द्यावा व उरलेला ६०% फळफुगवणीच्या काळात द्यावा.
४. गंधक, कॅलशियम व मॅग्नेशियम व सुक्षम अन्नद्रव्यांचा वापर शाखीय तसेच फळ दाढीच्या काळात सामान मात्रेत करावा.

## डाळींबाचे खत व्यवस्थापन

**प्रति एकर शिफारीत खत मात्रा – १५० कि नत्र : ६० कि स्फुरद ६० कि पालाश**

| बहार नंतरचे दिवस | पिकाची अवस्था | खताचे नाव | खतमात्रा कि/एकर | खत वापरण्याची पध्दत |
|---|---|---|---|---|
| अ | बहार फेज | | | |
| –१० | बहार धरण्याची अवस्था | स्मार्टटेक १०:२६:२६ | ६० | सर्व रासायनिक खते सेंद्रिय खतांसोबत मिसळुन मुळांच्या कार्यक्षेत्रात मातीआड करून द्यावे |
| | | महाधन बेनसल्फ | १० | |
| | | महाधन मॅग्नेशियम सल्फेट | १० | |
| | | महाधन झिंक सल्फेट | २.५ | |
| | | महाधन फेरस सल्फेट | ५ | |
| | | महाधन डिटीबी बोरॉन | २.५ | |
| | | महाधन सेंद्रिय खत | १५०० | |
| | | पीएसबी | ५ | |
| | | व्हाम | ५ | |
| १५ | सुरुवातीची वाढ व कळी अवस्था | महाधन १२:६१:०० | २.५ | खते २ हप्त्यात विभागुन, फवारणीद्वारे द्यावी |
| ३० | | महाधन कॅल्शियम नायट्रेट | १.५ | |
| | | महाधन चिलेटेड कॉम्बी | ०.२५ | |
| | | महाधन डॉट बोरॉन | ०.२५ | |
| ४५ | | महाधन १२:६१:०० | २.५ | |
| | | महाधन कॅल्शियम नायट्रेट | १.५ | |
| ६० | | महाधन चिलेटेड कॉम्बी | ०.२५ | |
| | | महाधन डॉट बोरॉन | ०.२५ | |
| ६१ ते ९० | फळ लागण्याची अवस्था | महाधन कॅल्शियम नायट्रेट | १० | ठिबकद्वारे विभागुन द्यावीत |
| | | महाधन मॅग्नेशियम सल्फेट | १० | |
| | | महाधन कॅल्शियम नायट्रेट | १.५ | खते २ हप्त्यात विभागुन, फवारणीद्वारे द्यावी |
| | | महाधन चिलेटेड कॉम्बी | ०.२५ | |
| | | महाधन डॉट बोरॉन | ०.२५ | |
| ९१ ते १२० | सुरुवातीची फळ वाढीची अवस्था | महाधन १२:६१:०० | २० | ठिबकद्वारे विभागुन द्यावीत |
| | | महाधन १३:००:४५ | २५ | |
| | | युरीया | ५० | |
| | | महाधन मॅग्नेशियम सल्फेट | १० | |
| | | महाधन कॅल्शियम नायट्रेट | १.५ | खते २ हप्त्यात विभागुन, फवारणीद्वारे द्यावी |
| | | महाधन चिलेटेड कॉम्बी | ०.२५ | |
| | | महाधन डॉट बोरॉन | ०.२५ | |

**टिप : १२० दिवसानंतरचे खतांचे वेळापत्रक पुढील अंकात (ऑक्टोबर २०१८) दिले जाईल.**

# महाधन वार्तांकन



ॲग्रोवन ॲग्रो व्हिजन

## स्मार्टकेमचे महाधन स्मार्टेक खत बाजारात उपलब्ध



ॲग्रोवन प्रादेशिक

## कापूस पीक नियोजनातून हमखास उत्पादन वाढ

'ॲग्रोवन' आणि 'स्मार्टकेम टेक्नॉलॉजी'च्या चर्चासत्रात मार्गदर्शन



ॲग्रोवन प्रादेशिक

## ऊस शेतीचे योग्य व्यवस्थापन करा

वरिष्ठ शास्त्रज्ञ प्रा. जयवंत जगताप; आरळे येथे ऊसविषयक चर्चासत्र



ॲग्रोवन विदर्भ

## 'शेतकऱ्यांनी माती परीक्षणावर भर द्यावा'



ॲग्रोवन प्रादेशिक

## 'एकरी शंभर टन ऊस उत्पादनासाठी सेंद्रिय कर्ब वाढविण्याची गरज'




OFM : AT - SHEGAON, TAL – JATH, DIST – SANGLI




CO -OPEARATIVE MEETING : AT - KOREGAON, TAL – WALWA, DIST – SANGLI
SHRI. B.K. PATIL ( FOUNDER – HANUMAN SANGH ) GIVING EXCELLENT SPEECH FOR SUGARCANE CROP



VOW : AT. MANDAR, TAL. WANI, DIST. YAVATMAL




CROP SEMINAR : AT - SANSAR, TAL – INDAPUR, DIST – PUNE
THE CROP SEMINAR WAS ON SUGARCANE CROP AND MAIN SPEAKER WAS A MR. S. B. MANE (PATIL) SIR, SUGARCANE EXPERT VSI, MANJARI.

## भारतीय शेतकऱ्यांनी हवामान बदलाच्या संकटाचा सामना करण्यास केला तंत्रज्ञानाचा अवलंब

लागवड हंगामाच्या तोंडावर जेव्हा पाण्याची अतिशय गरज असते, पावसाने ओढ दिलेही असताना देखील उत्तर भारतातील हरियाना राज्यातील शेतकरी श्री. लवप्रित सिंगांसाठी सर्व काही संपलेले नाही. कारण, त्यांना मदत मिळते आहे एका नवीन ग्रीनसीकर सारख्या तंत्रज्ञानाची. ग्रीनसीकर हे एक हाताळण्यास सोपे असे पिक-संवेदना मोजण्याचे संयंत्र असुन, लाल व अवरकत किरणांच्या सहाय्याने, पिकाचे आरोग्य मापन करण्यास याचा उपयोग होतो. श्री. सिंग या संयंत्राचा उपयोग आपल्या जमिनीतल नत्राचे मुल्यांकन करून त्याची गरज पुर्ण करण्यासाठी करतात.





श्री. सिंग वापरत असलेल्या इतर अनेक संयंत्रापैकी, ग्रीनसीकर हे एक आहे व ते म्हणतात की याच्या वापराने उत्पन्नामध्ये पुर्वी होत असलेल्या नुकसानीच्या तुलनेत नक्कीच सुधारणा होताना दिसते. तंत्रज्ञानाच्या अवलंबाने त्यांची खुपच मदत झाली असल्याचे ते म्हणतात. ते पुढ म्हणतात की हवामानाच्या बऱ्यापैकी अचुक अंदाजाने, पेरणी व फवारणीसारख्या कामांचे चांगल्या प्रकारे नियोजन करता येते, अन्यथा याच कामांवर आधिक पैसा व मनुष्यबळ खर्ची पडत असे. आणि अवकाळी पाऊस झाल्यास सर्वच प्रयत्न पाण्यात. तंत्रज्ञानाने माझ्या नफ्यात फार मोठी वाढ जरी केली नाही तरी नुकसान कमी करण्यास नक्कीच मदत झाली आहे असे ते मानतात.

श्री. लवप्रीत सिंग यांची ५० एकर शेती आहे व कुटूंबातील सर्व सदस्य यावर गुजराण करतात. त्यांच्याप्रमाणे इथे बहुतेक सर्व लोक शेतीवर अवलंबून आहेत. यामुळे स्थानिक कृषी संस्था, या तंत्रज्ञानाची खरेदी करून शेतकऱ्यांना त्याची उपलब्धता करून देतात. तेथे वापर होत असलेले अजुन एक तंत्रज्ञान म्हणजे लेझर आधारीत जमिन सपाट करणेचे यंत्र **'लेझर लँड लेवलर'** हे यंत्र ट्रॅक्टर-चलीत असुन जमिन सपाट करून त्यास योग्य उतार देण्यास शेतकऱ्यांची मदत करते. या पध्दतीमुळे पाणी वापरामध्ये २५-३० टक्के बचत होते. याचप्रमाणे भात शेतीमध्ये यंत्राच्या सहाय्याने पेरणीचा अवलंब केल्यास पाणी व मनुष्यबळ या दोन्हीमध्ये बचत करता येईल. ही पध्दत, भात लावणीच्या चालू पध्दतीला की ज्याच्यामध्ये नर्सरीमध्ये रोपे वाढवुन त्याची पुनर्लागण मनुष्यबळा करवी केली जाते, चांगला पर्याय आहे. परंपरेने, भारतीय शेतकरी प्रत्येक कापणीनंतर शेत स्वच्छ करण्यासाठी मजुरीवर बराच पैसा खर्च करतात. हा अनावश्यक खर्च कमी करण्यास त्यांना मदत होईल.

## शेतकऱ्यांचा अनुभव

**मुळांची उत्तम वाढ व विकास**



**गणेश जयराम भोगे**

मु. पो. कायगाव, ता. गंगापूर जिल्हा. औरंगाबाद

मी आपल्या कंपनीचे महाधन स्मार्टेक १०.२६.२६ हे खत कांदा पिकाकरिता इतर कंपनीच्या १०.२६.२६ खतासोबत तुलना करुन पहाण्यासाठी वापरले होते. एक एकरापैकी अर्धा एकरामध्ये महाधन स्मार्टेक १०.२६.२६ वापरले. महाधन स्मार्टेक १०.२६.२६ वापरल्याचे खुप चांगले फायदे कांदा पिकामध्ये दिसून आले. सर्वात आधी एकसमान वाढ दिसून आली.पातीला हिरवेगारपणा (काळोखी) जास्त आली.पांढऱ्या मुळींची संख्या वाढून पिकाची झपाट्याने वाढ होताना दिसली. पातीची लांबी व रुंदी वाढलेली दिसली. रोग व किडीचा प्रादुर्भाव कमी दिसून आला. पिकाची एकूण परिस्थिति पहाता १५ ते २० % उत्पादन वाढ निश्चितच मिळेल. माझा शेतकरी बंधूना सल्ला राहील की ईतर कंपनीच्या १०.२६.२६ पेक्षा महाधन स्मार्टेक १०.२६.२६ हेच खत वापरावे.

**जोमदार पीक**



**योगेश काळे**

मु. पो. जुनेकावसान, ता. पैठण जिल्हा. औरंगाबाद (९७६६०३७४८०)

मी आपल्या कंपनीचे महाधन स्मार्टेक १०.२६.२६ हे खत ऊस पिकाकरिता इतर कंपनीच्या १०.२६.२६ खता सोबत तुलना करुन पहाण्यासाठी वापरले होते. एकूण एक एकरापैकी अर्धा एकरामध्ये महाधन स्मार्टेक १०.२६.२६ वापरले. महाधन स्मार्टेक १०.२६.२६ वापरल्याचे अतिशय सुदंर फायदे उभ्या पिकामध्ये दिसून आले. सर्वात आधी पूर्ण पिकाची एकसमान वाढ जाणवली. पानातील हिरवेगारपणा जास्त दिसला. पांढऱ्या मुळींची संख्या वाढून पिकाची झपाट्याने वाढ होताना दिसली. पानाची रुंदी वाढून देखील रोगाचे प्रमाण कमी राहिले. पिकाची एकूण परिस्थिति पहाता १५ ते २०% उत्पादन वाढ निश्चितच राहील. माझा शेतकरी मित्रांना सल्ला राहील की इतर कंपनीच्या १०.२६.२६ पेक्षा महाधन स्मार्टेक १०.२६.२६ हेच खत वापरावे.

**नफ्यात वाढ**



**गोविंद मोरे**

मु. पो. औसा, ता. औसा, जिल्हा - लातूर

मी महाधन स्मार्टेक १०.२६.२६ कोबी पिकासाठी वापरले. नेहमी वापरत असलेल्या १०.२६.२६. खतापेक्षा हे खत वेगळे वाटले. पानांची संख्या वाढलेली आढळली व वाढ जोमदार वाटली. पानातील हिरवेपणा काढणी पर्यंत टिकून होता. कोबीच्या गड्ड्यांची वाढ चांगली झाली व आकार चांगला राहिला. नेहमीच्या तुलनेत उत्पादन २० ते २५% वाढले. भाव चांगला मिळाला. या पुढे देखील मी महाधन स्मार्टेक १०.२६.२६ पुढील हंगामातील काकडी, भेंडी, उस व टोमॅटो पिकासाठी वापरणार आहे.

# मनोगत

**प्रिय शेतकरी बंधू**

गेल्या अनेक वर्षापासूनचे आपले ऋणानुबंध आहेत व गेली अनेक दशके आपण महाधन या आमच्या दर्जेदार खतांच्या श्रेणीवर विश्वास दाखविला आहे. आपल्या भक्कम पाठबळावरच आज **'महाधन'** ची यशस्वी वाटचाल सुरू आहे व यापुढेही राहील. तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्थान मिळविण्यासाठी व शेतकऱ्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी महाधन सतत प्रयत्नशील आहे. भविष्यात नवीन तंत्रज्ञानावर आधारित नव-नवीन क्रांतीकारी खते आपल्या सेवेस आणण्याचा संकल्प आम्ही केला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार यावर्षी महाराष्ट्रातील बहुतांश ठिकाणी १००% पावसाची शक्यता वर्तविली आहे. खरिप पिकांसाठी हा पाऊस चांगला असुन उत्पादन वाढीसाठी पुरक ठरेल.

बदल हा सृष्टीचा नियमच आहे व सकारात्मक बदल कोणाला नको असतो. आपला शेतकरी बांधव सुध्दा याला अपवाद नाही. पैशाचा मोठा मोबदला व परतावा मिळत असेल तर शेतकरी बांधव सर्वप्रथम अशा बदलांना अंगिकारतो हा आज पर्यंतचा इतिहास आहे. यालाच अनुसरून आम्ही यंदा नव-नवीन उपक्रम राबविण्याचा संकल्प केला आहे. याचाच एक भाग म्हणून एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी शेतकरी बंधूना प्रोत्साहन मिळावे व त्यांचा उत्साह वाढावा या दृष्टीने आम्ही **'महाधन मिस्ड कॉल धमाका'** ही बक्षिस योजना या खरिप हंगामात राबवित आहोत. या विषयीची जाहिरात **दि. २२ जून २०१८** **रोजी ॲग्रोवन** दैनिकामध्ये प्रकाशित करण्यात आली. या उपक्रमाचा प्रसार जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी आमचे प्रतिनिधी कार्यरत असून आपणही या योजनेला सहकार्य करावे ही अपेक्षा.



या योजनेअंतर्गत शेतकरी बंधूनी **दि. १ एप्रिल ते ५ ऑगस्ट** दरम्यान महाधन खतांचा वापर केला असल्यास ते या योजनेस पात्र ठरतील. बक्षिसाचे मानकरी ठरलेल्या शेतकरी बंधूनी महाधन खते खरेदी केल्याची पावती पडताळणी करिता जपून ठेवावी लागेल. या योजनेच्या नियम व अटी आमच्या www.mahadhan.co.in या संकेतस्थळावर पहावयास मिळतील.


**हा खरिप हंगाम आपणास सुख-समृध्दीचा, भरभराटीचा व आरोग्यदायी जावो ही शुभेच्छा व्यक्त करतो.**



आपला

नरेश देशमुख
एक्झिक्युटिव्ह व्हाईस प्रेसिडेन्ट
(प्रमुख - स्ट्रॅटेजी ॲण्ड मार्केटिंग)






Book - Post

स्मार्टकेम टेक्नॉलॉजीज् लिमिटेड

साई हिरा, सर्व्हे नं. ९३, मुंढवा रोड,
मुंढवा, पुणे - ४११ ०३६..